मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समाविष्ट नळ पाणीपुरवठा योजनांकरिता सौर ऊर्जा पध्दतीचा वापर करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१७/प्र.क्र.१३३/पापु-१९

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: २७ डिसेंबर, २०१८

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दिनांक ०७ मे, २०१६
२) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दिनांक १५ जून, २०१५
३) शासन निर्णय क्रमांक: ग्रापापु-२११५/प्र.क्र.३९/पापु-१९, दिनांक २३ सप्टेंबर, २०१६
४) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१७/प्र.क्र.८३/पापु-१९, दिनांक २५ जानेवारी, २०१७
५) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१७/प्र.क्र.७३/पापु-१९, दिनांक १८ मे, २०१७
६) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१७/प्र.क्र.११०/पापु-१९, दिनांक १४ जुलै, २०१७
७) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१७/प्र.क्र.१४/पापु-१९ (शिकाना), दिनांक ११ जाने, २०१८
८) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१८/प्र.क्र.७२/पापु-१९, दिनांक २७ मार्च, २०१८
९) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१७/प्र.क्र.११०/पापु-१९, दिनांक २७ मार्च, २०१८
१०) मुख्यमंत्री सचिवालय यांची टिप्पणी क्रमांक: मुमंस-२०१८/प्र.क्र.०५/प्रशासकीय कक्ष, दिनांक ११ जुलै, २०१८

**प्रस्तावना:-**

राज्याच्या ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विविध कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहेत. पाणी पुरवठा योजनांच्या एकूण देखभाल दुरुस्तीच्या खर्चाचा विचार केल्यास सुमारे ४० ते ७० टक्के खर्च हा विद्युत देयकावर असतो. हा खर्च पाणी पट्टीच्या वसुलीतून भागवायचा असतो. स्थानिक स्वराज्य संस्थाकडून आकारण्यात आलेल्या पाणीपट्टीची पुरेशा प्रमाणात वसूली होत नसल्याने विद्युत देयक भरता येत नाही. पर्यायाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून अशा योजनांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येतो. परिणामी योजना बंद पडून त्या कायमस्वरुपी निकामी होण्याची शक्यता असते. यावर उपाय म्हणून सौर ऊर्जा वापरणे हा उत्तम पर्याय ठरु शकतो. तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांनी छोटे, आर्थिकदृष्ट्या कमी उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतीना वीजबिल भरण्यामध्ये अडचणी येत असल्याने त्या गावांमधील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना सौरऊर्जा पध्दतीचा वापर करुन राबविण्यात यावी, असे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समाविष्ट छोटया व आर्थिकदृष्टया कमी उत्पन्न असलेल्या गावांतील नळ पाणीपुरवठा योजनांकरिता सौर ऊर्जा पध्दतीचा वापर करणेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूरी देण्यात आलेल्या १० अश्वशक्ती (HP) क्षमतेपर्यंतच्या नळ पाणीपुरवठा योजनांकरिता सौर ऊर्जेचा वापर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार अंमलबजावणी यंत्रणांनी (जिल्हा परिषद/मजीप्रा) खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करुन कार्यवाही करावी.

१) सौर पंप आस्थापित करताना नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी विहीत केलेल्या निकषानुसार सावली विरहित पुरेसी जागा (Shadow Free Area) उपलब्ध असल्याची व सदर जागा ग्रामपंचायतीच्या नावे असल्याची खात्री करण्यात यावी.

२) सौर पंप आस्थापित करताना केंद्र शासनाच्या नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मागदर्शक सूचना व तांत्रिक मोजमापे याचा अवलंब करण्यात यावा.

३) सौर पंप आस्थापित करण्याचे काम खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात यावे. सदर निविदेसाठी येणारी सौर पंपाची किंमत केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत (Bench Mark Cost) दरपत्रकानुसार ठरविण्यात यावी.

४) सौर पंप (सौर ऊर्जा संच, पंप, पॅनेल व अनुषंगिक साहित्य सामुग्री) उभारणीसाठी किमान ५ वर्षाच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीची अट निविदेमध्ये नमुद करण्यात यावी.

५) सौर पंप आस्थापित करण्यापुर्वी सदर सौर पंप कार्यक्षम असल्याचा नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून चाचणी अहवाल प्राप्त करुन घेण्यात यावा.

६) सदर पंपासाठी वापरण्यात येणारे सोलर पॅनलची (मोड्युल्स) क्षमता व योग्यता नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या परिमाणानुसार असावी. तसेच सोलर पॅनल भारतीय बनावटीचे असणे आवश्यक आहे. सोलर पॅनलचा हमी कालावधी (वॉरंटी) १० वर्षाचा असावा.

७) ज्याठिकाणी विद्युत पुरवठा उपलब्ध नाही त्याठिकाणी पारेषण विरहित सौर ऊर्जा संच आस्थापित करणे. आवश्यक असल्यास सौर ऊर्जा नेट मिटरींग पध्दतीचा अवलंब महाराष्ट्र विद्युत पारेषण कंपनी व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना व परिपत्रकानुसार करण्यात यावा.

८) सौर ऊर्जेवर चालणा-या पंपाच्या पॅनेलच्या सुरक्षिततेस अत्यंत महत्व देण्यात यावे. यासाठी नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सुचनेतील सुरक्षिततेच्या

निकषांचा वापर करण्यात यावा. तसेच सौर उर्जेच्या पॅनेल भोवती तारेचे/भिंतीचे कंपाऊंड बांधणे अनिवार्य आहे. सौर पॅनेल जमिनीपासून किमान २-३ मीटर उंचीवर उभारले जावेत.

९) सौर ऊर्जा पंप आस्थापित करण्यापुर्वी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाकडून (महाऊर्जा) तांत्रिक मान्यता घेण्यात यावी. तसेच सौर पंपाची उभारणी पुर्ण झाल्यानंतर व पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाल्यानंतर त्याची १०० टक्के तांत्रिक तपासणी महाऊर्जा व जिल्हा परिषद/ मजीप्रा यांचेकडून करण्यात यावी.

२. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांर्तत मंजूर नळ पाणीपुरवठा योजनांकरिता सौर ऊर्जा पंपाचा वापर केल्याने योजनेच्या मूळ प्रशासकीय मंजूरीप्राप्त किंमतीमध्ये वाढ होत असल्यास, अशा योजनांची अंदाजपत्रके सुधारीत प्रशासकीय मंजूरीसाठी शासनास सादर करण्यात यावीत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२२०१७२४५९९४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ram Apparao Sabane

Digitally signed by Ram Apparao Sabane
DN: CN = Ram Apparao Sabane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2018.12.27 14:20:18 +05'30'

**(रा. अ. साबणे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
५. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
६. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
९. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
१०. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
११. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग (सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१३ निवडनस्ती (पापु-१९)

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार
स्थापित राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता
मिशन अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या
समित्यांची पुनर्रचना.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-२०१८/प्र.क्र.१७४/पापु-०७
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: ०१ जानेवारी, २०१९

वाचा

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक-ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१७५(ब)/ पापु-०७, दिनांक १० फेब्रुवारी, २०११.

शासन शुध्दीपत्रक :-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिनांक १० फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन (SWSM) अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या राज्य शिखर समितीत खालील दोन विभागाच्या सचिवांचा समावेश करण्यात येत आहे.

राज्य शिखर समिती

| विभागाचे नाव | पद |
|---|---|
| सचिव, जलसंपदा विभाग | सदस्य |
| सचिव, कृषी विभाग | सदस्य |

तसेच कार्यकारी समितीत खालील उप सचिवांचा समावेश करण्यात येत आहे-

| विभागाचे नाव | पद |
|---|---|
| उप सचिव, जलसंपदा विभाग | सदस्य |
| उपसचिव, कृषी विभाग | सदस्य |

०२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक (२०१९०१०११७४५२६६०२८) असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ganesh Nivrutti Pawar

Digitally signed by Ganesh Nivrutti Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=805bdef8ce1424c02121cece0d20e917ffa1ef512d7e8fa2e49d93adbb5ad352, cn=Ganesh Nivrutti Pawar
Date: 2019.01.02 12:45:59 +05'30'

**( ग.नि. पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.राज्यमंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री/राज्यमंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व सन्माननीय विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव, यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०)अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११)अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१२)अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३)अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१४)अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१५)अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१६)अपर मुख्य सचिव, कृषि व पदुम विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१७)महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१८)सचिव, पर्यावरण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१९)सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२०)सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई.

२१)धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त कार्यालय, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-१८.
२२)व्यवस्थापकीय संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई
२३)संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पी.एम.टी. बिल्डींग स्वारगेट, पुणे.
२४)मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२५)महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
२६)महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
२७)मुख्य अभियंता व विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८)मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व),
२९)अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व),
३०)संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
३१)उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी(सर्व),पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई
३२)निवडनस्ती(पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, नवीन मंत्रालय, मुंबई.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जिवित करावयाच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांमध्ये नवीन योजनांचा समावेश करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१८/प्र.क्र.१८३/पापु-१९**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: १० जानेवारी, २०१९

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दिनांक ०७ मे, २०१६
२) शासन निर्णय क्रमांक: ग्रापापु-२११५/प्र.क्र.३९/पापु-१९, दिनांक २३ सप्टेंबर, २०१६
३) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१७/प्र.क्र.८३/पापु-१९, दिनांक २५ जानेवारी, २०१७

**प्रस्तावना:-**

राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस स्वच्छ आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत ८३ बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जिवित करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कार्यक्रमांतर्गत समाविष्ट एखादी योजना काही कारणास्तव रद्द झाल्यास अन्य योजना घेण्याचे अधिकार मा. मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखालील समितीस आहेत. त्यानुसार मा. मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या दि.१८ डिसेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जिवित करावयाच्या प्रादेशिक योजनांमध्ये ०५ नवीन योजनांचा समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, मा. मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या दि.१८ डिसेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जिवित करावयाच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांमध्ये खालील ०५ योजनांचा नव्याने समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पुनरुज्जिवित करावयाच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे नाव | तालुका | जिल्हा | अंदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | मौ. उंडाळे व १७ गांवे | कराड | सातारा | ४४३.७० |
| २ | मौ. आलेगांव नवेगाव-१४ गांवे | पातूर | अकोला | ६२९.१२ |
| ३ | मौ. देऊळगांव पास्टुल-१६ गांवे | पातूर | अकोला | ८२९.२० |
| ४ | मौ. बडुर व ५ गांवे | बिलोली | नांदेड | १९२.०० |
| ५ | मौ. किल्लारी-३० गांवे | औसा | लातूर | २८७१.०७ |

२. सदर योजनांच्या मंजूरीची व अंमलबजावणीची कार्यवाही मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०१०९१८१३१०९८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ram Apparao Sabane

Digitally signed by Ram Apparao Sabane
DN: CN = Ram Apparao Sabane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2019.01.10 14:39:12 +05'30'

**(रा. अ. साबणे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिच, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
७. विभागीय आयुक्त (पुणे/औरंगाबाद/अमरावती)
८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सातारा/अकोला/नांदेड/लातूर)
१०. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
११. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)

१२. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)

१३. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

१४. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सातारा/अकोला/ नांदेड/लातूर)

१५. निवडनस्ती (कार्यासन पापु-१९)

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या
प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिकारात
सुधारणा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-२०१८/प्र.क्र.१७१/पापु-०७

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: **११ फेब्रुवारी, २०१९.**

**वाचा:-**

**१) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४/पापु-०७, दि. १ ऑगस्ट, २००९.**
**२) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४ (अ)/पापु-०७, दि. १७ मार्च, २०१०.**
**३) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४ (अ)/पापु-०७, दि. ३० ऑगस्ट,२०१०.**
**४) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१२१३/प्र.क्र.३५/पापु-०७, दि. १६ जुलै, २०१३.**
**५) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दि. ०९ जुलै, २०१४.**
**६) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दि. १७ ऑक्टोबर, २०१४.**
**७) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२२/पापु-०७, दि. १६ फेब्रुवारी, २०१५.**
**८) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दि. १० मार्च, २०१५.**
**९) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दि. १५ जून , २०१५.**
**१०) शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१६/प्र.क्र.८३/पापु-१९, दि. २५ जानेवारी , २०१७**
**११) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-२०१७/प्र.क्र.५३/पापु-०७, दि. ०९ मार्च, २०१८**

**प्रस्तावना:-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने मागणी आधारित लोकसहभागाचे लोकाभिमुख धोरण स्वीकारले आहे. सन २००९-१० पासून या कार्यक्रमाचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (National Rural Drinking Water Programme-NRDWP) असे करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी संदर्भ क्र. (१) ते (११) येथील शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी मार्गदर्शक सुचना वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांसाठी या विभागाच्या संदर्भाधीन दि. १७ मार्च, २०१०, ३० ऑगस्ट, २०१० व दि.१६ जुलै, २०१३

च्या शासन निर्णय/शुद्धीपत्रकान्वये ग्रामसभेस रु.५०.०० लक्षपर्यंतचे व स्वतंत्र/ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी जिल्हा जलव्यवस्थापन समितीस रू. ५ कोटीपर्यंतचे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तथापि प्रशासकीय मान्यता देतांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडे (प्रामुख्याने ग्रामपंचायतीकडे) पुरेसे मनुष्यबळ अथवा तांत्रिक/प्रशासकीय क्षमता नसल्यामुळे बऱ्याच पाणी पुरवठा योजनांची योग्य प्रकारे छाननी न होता, त्यांना मान्यता दिली जात असल्याचे तसेच जिल्हा स्तरावर योजनांच्या प्रशासकीय मान्यतेस विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने ग्रामसभेच्या प्रशासकीय मान्यतेच्या, निविदा स्वीकृतीच्या अधिकारात आणि जिल्हा जलव्यवस्थापन समितीच्या प्रशासकीय मान्यतेच्या अधिकारात सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेच्या धर्तीवर तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणीचे अधिकार, निविदा स्वीकृतीचे अधिकार यामध्ये सुसुत्रता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णयः-

०३. राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या संदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणीचे अधिकार, निविदा स्वीकृतीचे अधिकार यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**अ) तांत्रिक मान्यतेचे अधिकार :-**

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे तांत्रिक मान्यतेचे अधिकार संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | तांत्रिक मान्यतेचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु.२.०० कोटीपर्यंत | रु.२.०० कोटी ते रु.५.०० कोटी | रु.५.०० कोटी वरील सर्व |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु.२.०० कोटीपर्यंत | रु.२.०० कोटी ते रु.५.०० कोटी | रु.५.०० कोटी वरील सर्व |

संबंधित तांत्रिक प्राधिकरणाकडे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक मान्यतेचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक राहील.

**ब)प्रशासकीय मान्यतेचे अधिकार:-**

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | प्रशासकीय मान्यतेचे अधिकार (दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या योजनांसाठी) | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामसभा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (शासन) |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | - | रु.५.०० कोटी पर्यंत | रु.५.०० कोटीवरील सर्व |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | - | रु. ५.०० कोटी पर्यंत | रु. ५.०० कोटीवरील सर्व |

(i) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना निधीच्या उपलब्धतेनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता द्यावी. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीची मान्यता प्राप्त वार्षिक कृती आराखडयामध्ये समाविष्ठ असलेल्या योजनाच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधून राबविण्यात येतील.

(ii) रु.५.०० कोटी पेक्षा अधिकच्या व दरडोई खर्चाच्या निकषात न बसणाऱ्या सर्व योजनांचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मार्फत प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करावेत.

(iii) ग्रामीण पाणी पुरवठा योजनेस सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतांना त्यासोबत योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR), अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची प्रत सादर करावी.

(iv) या पार्श्वभूमीवर विहित वित्तीय प्राधिकारात/विविध निकषात स्वतंत्र पाणी पुरवठा योजना वाटत असल्या तरी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत सहभागी गावात स्वतंत्र योजना जिल्हा परिषद स्तरावर मंजूर करण्यात येऊ नये.

**क) क्षेत्रिय स्तरावरील अंमलबजावणी:-**

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजना अंमलबजावणीचे अधिकार संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | अंमलबजावणीचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | जिल्हा परिषद | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | - | रु.५.०० कोटी पर्यंत | रु.५.०० कोटीवरील सर्व |

| अ.क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | अंमलबजावणीचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | जिल्हा परिषद | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | - | रु. ५.०० कोटी पर्यंत | रु. ५.०० कोटीवरील सर्व |

(i) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करीत असताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने ई-निविदा प्रक्रियेचा व गरजेनुसार सर्वसाधारण निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा.

(ii) प्रगतीपथावर असलेल्या पाणी पुरवठा योजनांपैकी ज्या योजना ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित आहेत, अशा योजनांबाबत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती काम करण्यास तयार असल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती समवेत करार करुन योजना पूर्ण करण्याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घ्यावी.

**ड) निविदा स्वीकृतीचे अधिकार:-**

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | निविदा स्विकृतीचे अधिकार (अंदाजपत्रकीय दराने प्राप्त होणाऱ्या निविदांसाठी) | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामसभा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| १ | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | - | रु.५.०० कोटी पर्यंत | रु.५.०० कोटीवरील सर्व |
| २ | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | - | रु. ५.०० कोटी पर्यंत | रु. ५.०० कोटीवरील सर्व |

(i) अंदाजपत्रकीय दरापेक्षा अधिक रकमेच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदा स्विकृतीसाठी शासनाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या निविदा स्वीकृतीसाठी यापूर्वीची कार्यपध्दती पुढेही सुरु राहील.

(ii) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी सदर शासन निर्णय लागू राहील. तथापि, ज्या योजनांची निविदा स्विकृती या शासन निर्णयापूर्वीच झालेली असेल अशा योजनांसाठी या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहणार नाही.

**इ) परिचालन व देखभाल :-**

शासन निर्णय दिनांक १७ मार्च, २०१० व दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ नुसार स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष ही योजना हाताळणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. त्यानंतर स्वतंत्र योजनेच्या परिचालन व देखभालीची जबाबदारी संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची आहे. व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या प्रचालनाची जबाबदारी शिखर समितीची आहे.

(i) ग्रामीण पाणी पुरवठा योजना (स्वतंत्र/प्रादेशिक) संबंधित समितीकडे हस्तांतरीत न झाल्यास योजनेच्या प्रचालनाची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची आहे.

(ii) योजना कार्यान्वित केल्याच्या तारखेपासून ज्या ग्रामपंचायतीस पाणी पुरवठा करण्यात येत असेल त्यांना देण्यात येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणात व आवश्यक पाणीपट्टीनुसार देयक आकारणी योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने (जिल्हा परिषद अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) करुन देयकांची वसुली संबंधित लाभार्थी ग्रामपंचातकडून करावी.

(iii) स्वतंत्र वा प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रचालनासंदर्भात संबंधित कंत्राटदाराशी करारनामा करून योजना पूर्ण झाल्यानंतर ३ ते ५ वर्ष कालावधीसाठी देखभाल करण्याचा पर्याय अंमलबजावणी यंत्रणेस आहे.

कंत्राटदारामार्फत योजना पूर्णत्वानंतर करावयाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च पाणी पुरवठा योजनांच्या सविस्तर प्रकल्प अहवालात तसेच योजनेच्या भांडवली खर्चात समाविष्ट करता येणार नाही. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीबाबत उपरोक्त संदर्भ क्र.(६) येथील दि.१७ ऑक्टोबर, २०१४ च्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

सदर आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२१११४४८५७६४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Watersupply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef8a156550c1999143688f755340a6b9d3ad380fcde16709e4e63210467e734, serialNumber=19d0cb2b5b2018974e0c848afbd781451d1c4c0d347d2a12395c8dffac4670f9, cn=Sham Lal Goyal
Date: 2019.02.12 16:37:31 +05'30'

(शाम लाल गोयल)

**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. मंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१०. विभागीय आयुक्त (सर्व)
११. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१४. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१५.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१६.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१७.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१८.अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१९.अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२०.कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२१. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
२२.कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२३.सर्व ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या (संचालक,वासो,नवी मुंबई यांच्या मार्फत)
२४.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व अधिकारी व कार्यासने
२५. निवडनस्ती (कार्यासन पापु-०७)

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना- तीनही टप्प्यांचे कार्यारंभ आदेश एकाच वेळी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापाधो-२०१९/प्र.क्र.४७/पापु-०७**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
क्राफर्ड मार्केटजवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई. ४०० ००१.
दिनांक: १९ जुलै, २०१९

**वाचा:-**

१) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४/पापु-०७, दिनांक ०१ ऑगस्ट, २००९.
२) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१०.
३) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक ३० ऑगस्ट, २०१०
४) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-१२१३/प्र.क्र.३५/पापु-०७, दिनांक १६ जुलै, २०१३.
५) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक ०९ जुलै, २०१४.
६) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१४.
७) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५.
८) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १० मार्च, २०१५.
९) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दिनांक १५ जून, २०१५.
१०) शासन निर्णय क्रमांक:मुपेयो-२०१६/प्र.क्र.८३/पापु-१९, दिनांक २५ जानेवारी, २०१७.
११) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-२०१७/प्र.क्र.५३/पापु-०७, दिनांक ०९ मार्च, २०१८.
१२) शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-२०१८/प्र.क्र.१७१/पापु-०७, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९.

**प्रस्तावना:-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने मागणी आधारित लोकसहभागाचे लोकाभिमुख धोरण स्वीकारले आहे. सन २००९-१० पासून या कार्यक्रमाचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (National Rural Drinking Water Programme-NRDWP) असे करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी संदर्भ क्र.(१) ते (१२) येथील शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी मार्गदर्शक सुचना वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांसाठी या विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १७ मार्च २०१०, ३० ऑगस्ट २०१०, व दिनांक १६ जुलै २०१३ च्या शासन निर्णय/शुध्दीपत्रकान्वये ग्रामसभेस रु. ५०.०० लक्षपर्यंतचे व स्वतंत्र/प्रादेशिक पाणी

पुरवठा योजनांसाठी जिल्हा व्यवस्थापन समितीस रु. ५ कोटीपर्यंतचे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तथापि, प्रशासकीय मान्यता देतांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडे (प्रामुख्याने ग्रामपंचायतीकडे) पुरेसे मनुष्यबळ अथवा तांत्रिक/प्रशासकीय क्षमता नसल्यामुळे बऱ्याच पाणी पुरवठा योजनांची योग्य प्रकारे छाननी न होता, त्यांना मान्यता दिली जात असल्याचे तसेच जिल्हा स्तरावर योजनांच्या प्रशासकीय मान्यतेस विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने ग्रामसभेच्या प्रशासकीय मान्यतेच्या, निविदा स्वीकृतीच्या अधिकारात आणि जिल्हा व्यवस्थापन समितीच्या प्रशासकीय मान्यतेच्या अधिकारात सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेच्या धर्तीवर तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणीचे अधिकार, निविदा स्वीकृतीचे अधिकार यामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-२०१८/ प्र.क्र.१७१/पापु-०७, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ अन्वये शासनाने घेतला आहे.

योजनांच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेतांना असे निदर्शनास येत आहे की, ज्या पाणी पुरवठा योजनांना शाश्वत स्त्रोतातून पाणी घेण्याची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे व त्या स्त्रोतातून तांत्रिक स्वरुपाची अडचण वगळता जसे, धरणात पाण्याची पातळी जास्त असणे, योजना पावसाळ्यात मंजूर होऊन कार्यादेश या कालावधीत मिळणे इत्यादी कारणांमुळे असल्यास ही कामे हाती घेतल्याशिवाय पुढील कामे करता येत नाहीत. त्यामुळे योजनेच्या कार्यान्वन कालावधीत वाढ होऊन त्यांचा कार्यकाळ मंजूर कार्यकाळापेक्षा वाढतो. यात संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१० शासन निर्णयातील परिच्छेद-८ मधील मुद्दा क्रमांक ८.१ प्रमाणे निविदा प्रक्रिया व कार्यारंभ आदेश याबाबत सूचना दिलेल्या असून, पाणी पुरवठा योजनेतील उपांग-१ चे काम सुरूवातीला केल्यानंतर स्त्रोत योग्य व पुरेसा असल्याचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त करून घ्यावयाचे आहे. त्यानंतर टप्पा-१ चे काम पूर्ण झाल्यानंतर टप्पा-२ चे कार्यारंभ आदेश द्यावेत. टप्पा-२ चे काम पूर्ण झाल्यानंतर टप्पा-३ च्या कामाचे आदेश द्यावेत अशी तरतूद केलेली आहे. तथापि ज्या ठिकाणी पाणी पुरवठा योजनेसाठी उद्भव (स्त्रोत) हा शाश्वत भूपृष्ठीय स्त्रोतातून जसे, धरण बारमाही नदी, मोठे तलाव इत्यादी, योग्य, पुरेसा, गुणवत्तापूर्ण आहे व अशा ठिकाणी टप्पा-२ आणि टप्पा-३ चे काम हाती घेण्यास

विलंब झाला तर त्याचा थेट परिणाम योजना पूर्णत्वास नेण्यास होत आहे. याशिवाय स्त्रोताचा विकास करण्यास तांत्रिक कारणांमुळे उशिर झाल्यास योजना पूर्णत्वाचा कालावधी वाढत आहे. या बाबी विचारात घेता ज्या ठिकाणी योजनेचा उद्भव (स्त्रोत) हा शाश्वत, योग्य, पुरेसा व गुणवत्तापूर्ण आहे व कोणतीही तांत्रिक अडचण नाही अशा ठिकाणी योजनेची उपांगे एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णयः-**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, संदर्भाधीन दिनांक १७ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ८ मधील ८.१ येथील टप्पा १ ते ३ चे कार्यारंभ आदेश देण्याची तरतूद रद्द करण्यात येत असून, याबाबत वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनाही रद्द करण्यात येत आहेत. योजनेतील उपांगाचे टप्पानिहाय कामे करण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत.

०२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर योजनेच्या खालील तीनही टप्प्यातील उपांगाबाबत एकत्रित निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

१) टप्पा १- स्त्रोतांचा विकास भुपृष्ठीय/भूजल स्त्रोतांचा विकासासंबंधी उपांगे जसे बोअरवेल घेणे, उद्भव विहिर, पाझर विहिर, जॅकवेल, जौडरस्ता इ. कामे

२) टप्पा २- पंपगृह, पंपींग मशिनरी, उर्ध्व वाहिनी, गुरुत्व वाहिनी व जलशुध्दीकरण केंद्र, सोलर, स्वयंचलित यंत्रणा (Automation), उर्वरित सर्व उपांगे.

३) टप्पा ३- साठवण टाक्या व घरगुती नळ जोडण्यांसह वितरण व्यवस्था इत्यादि कामे हे उपांग.

०३. **भूपृष्ठीय शाश्वत स्त्रोतावर आधारित योजना**:- कंत्राट करारनाम्यात दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व टप्प्यांची कामे एकाच वेळी सुरू करण्याचे नियोजन क्षेत्रीय स्तरावरुन करण्यात यावे. जिल्हा परिषद स्तरावरुन राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा), व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबत संबंधित कार्यकारी

अभियंता यांना विविध टप्प्याचे नियोजन करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन सर्व कामे केंव्हाही करून घेण्यासाठी हाती घेण्यात यावे.

०४. **भूजल स्त्रोत आधारित योजना:-** टप्पा-१ व टप्पा-३ ची कामे एकत्रित करण्यांस हरकत नाही, मात्र टप्पा-१ मधील Yield Test पूर्ण झाल्यावर जर Yield पुरेसा आहे तर टप्पा-२ मधील कामे करावीत. ज्या एखाद्या योजनेत टप्पा-१ ची कामे समाविष्ट नाहीत तेथे टप्पा-२ व ३ ची कामे एकत्रित करण्यांस हरकत नाही.

०५. वरील परिच्छेद ३ व ४ मधील सूचनांची अंमलबजावणी अशारितीने करावी की, नळ पाणी पुरवठा योजना दिलेल्या वेळेतच पूर्ण होईल किंवा दिलेल्या वेळेआधीच पूर्ण होईल. जेणेकरुन, लोकांना पाणी लवकरात लवकर मिळू शकेल.

०६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०७१९१४२११७५१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

VASANT
BHIMRAO MANE

Digitally signed by VASANT BHIMRAO MANE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=280e2beac20f526041fee94f6226522e1407a7f6aa0b06c8769634d48c2976bc, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VASANT BHIMRAO MANE
Date: 2019.07.19 14:26:07 +05'30'

**( वसंत माने )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव.
३. विभागीय आयुक्त (सर्व).
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
५. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुंणे.
६. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
८. जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व).
९. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).
१०.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व).

११.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१२.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१३.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
१४.उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१५.प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व).
१६.प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).
१७.जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व).
१८. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).
१९.गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व).
२०.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२.ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३.मंत्रालयातील इतर सर्व विभाग.
२४.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
२५.निवडनस्ती-पापु-०७.

**ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत**

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-२०१९/प्र.क्र.४९/पापु-०७**

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, लोकमान्य टिळक मार्ग

मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.

तारीख: **२१ ऑगस्ट, २०१९**

वाचा

**१) क्र. बैठक २०१८/प्र.क्र.७८/पापु-१९ दि. १९ एप्रिल २०१८ चे इतिवृत्त**

**२) क्र. बैठक २०१९/प्र.क्र.४९/पापु-०७ दि.१६ जुलै २०१९**

प्रस्तावना -

राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलस्वराज्य टप्पा-२ व मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम या कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील योजनांचा विदयुत देयकावरील व पर्यायाने देखभाल दुरुस्तीवरील भविष्यात होणारा खर्च कमी करण्यासाठी व शाश्वत ऊर्जा स्त्रोताचा वापर वाढविण्यासाठी नवीन योजनांमध्ये जेथे शक्य आहे तेथे सोलर पंप वापरण्याबाबत मार्गदर्शक सूचना निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम या कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील योजनांकरिता सौर ऊर्जा प्रकल्प राबविणे, त्याकरिता येणारा खर्च हा ज्या कार्यक्रमांतर्गत योजनांना मंजुरी मिळाली आहे, त्या योजनांच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात यावा. सदरील योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषद अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत होत असली तरी सर्व सौर ऊर्जा प्रकल्पांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण काम पाहील. सदर सौर ऊर्जा प्रकल्पांची निविदा प्रक्रिया एकत्रितपणे मध्यवर्ती कार्यालयाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२११६२४४५८३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VASANT BHIMRAO MANE

Digitally signed by VASANT BHIMRAO MANE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=280e2beac20f526041fee94f6226522e1407a7f6aa0b06c8769634d48c2976bc, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VASANT BHIMRAO MANE
Date: 2019.08.21 17:26:56 +05'30'

**( वसंत माने )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१०. विभागीय आयुक्त (सर्व)
११. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१४. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१५. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१८. अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

१९.अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२०.कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण..
२१. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
२२.कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२३.सर्व ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या (संचालक,वासो,नवी मुंबई यांच्या मार्फत)
२४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व अधिकारी व कार्यासने
२५. निवडनस्ती (कार्यासन पापु-०७)

**जल जीवन मिशन अंतर्गत पुर्ण झालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या सुधारणात्मक पुनर्जोडणी (रेट्रोफिटिंग) संदर्भात मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : जजीमि /०६२०/प्र. क्र.२०/पापु-०७**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई - ४०० ००१
दिनांक- ३० जून, २०२०

वाचा :-

१. केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन विषयक मार्गदर्शक सूचना दिनांक २५ डिसेंबर, २०१९
२. शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-२०१८/प्र.क्र.१७१/पापु-०७, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९
३. अध्यक्ष, दरसूची समिती तथा मुख्य अभियंता (प्र.), मजीप्रा, प्रादेशिक विभाग पुणे यांचे पत्र क्र. मु.अ. (पुणे)/ रेशा/नळ जोडणी दर/४९४, दिनांक १९ मे, २०२०
४. केंद्र शासनाचे पत्र क्र. ११०११/१/२०२०-SBM-DDWS दि.१७ मार्च २०२०
५. ग्राम विकास विभागाचे पत्र क्र. : जीपीडीपी २०२०/प्र.क्र. ३१/पंरा-६, दिनांक १९ मे, २०१९

**प्रस्तावना-**

केंद्र शासनाने दिनांक २५.१२.२०१९ रोजी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, केंद्र शासन देशातील ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत “हर घर नल से जल” (FHTC - Functional Household Tap Connection) प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास कटिबद्ध आहे. सद्य:स्थितीत राज्यात, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, राज्य पुरस्कृत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम व जागतिक बँक अर्थसहाय्यित जलस्वराज्य कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात येत आहेत. यातील ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत दरडोई दररोज ४० लिटर एवढा पाणी पुरवठा करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले होते. तथापि, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनशैलीत सुधारणा होण्याच्या दृष्टीने दरडोई दररोज ५५ लिटर पिण्याचे पाणी घरगुती नळ जोडणीद्वारे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. केंद्र शासनाचे उपरोक्त बदलते धोरण विचारात घेता, केंद्र शासन व राज्य शासनामार्फत यापूर्वी राबविण्यात आलेल्या विविध योजनांच्या अस्तित्वातील उपांगांचा वापर करून व आवश्यकतेनुसार त्यामध्ये काही बदल करून, योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (रेट्रोफिटिंग) करणे आवश्यक आहे. याबाबत सुस्पष्ट मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यातील सर्व वाड्या-वस्त्यातील प्रत्येक कुटुंबाला टप्प्या-टप्प्याने वैयक्तिक नळाद्वारे पाणी पुरवठा करणे अपेक्षित आहे. याबाबत जल जीवन मिशन मार्गदर्शक सूचनांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यांनी जे वार्षिक कृती आराखडे (Annual Action Plan) तयार केले आहेत, त्यात अशा वैयक्तिक नळजोडणीसाठी सुधारणात्मक पुनर्जोडणी (रेट्रोफिटिंग) च्या कामाचा समावेश केला आहे. अशा गावांसाठी, ज्या योजना सुधारणात्मक पुन:जोडणीसाठी (रेट्रोफिटिंग) प्रथम टप्प्यात घ्यावयाच्या आहेत, त्यांचे अंदाजपत्रक तयार करणेबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

ज्या योजनांचा संकल्पन कालावधी किंवा योजनेचे आयुष्य संपलेले नाही व ज्या योजनांमधून सद्य:स्थितीत पाणी पुरवठा सामुदायिक, सार्वजनिक नळाद्वारे होत आहे, अशा योजनांमधून दरडोई दररोज ५५ लिटर पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. अस्तित्वातील ज्या योजना दरडोई दररोज ५५ लिटर याप्रमाणे पाणी पुरवठा करण्यासाठी सक्षम आहेत किंवा, ज्या योजनांमध्ये पंपिंग तास वाढवून / पंपिंग मशिनरीमध्ये किरकोळ सुधारणा करून दरडोई

दररोज ५५ लिटर पाणी देणे शक्य आहे, अशा योजनांमध्ये वैयक्तिक नळ जोडणी देणे या कामाचा समावेश सुधारणात्मक पुनर्जोडणी (रेट्रोफिटिंग) या शिर्षाखाली करण्यात यावा आणि वैयक्तिक नळ जोडणी देण्याचे काम तात्काळ सुरु करण्यात यावे.

२. वरील गावांमध्ये गावातील अंतर्गत वाढीव वितरण वाहिन्या, आवश्यक असल्यास त्या कामाचा समावेश देखील याच सुधारणात्मक पुनर्जोडणी (रेट्रोफिटिंग) मध्ये करण्यात यावा .

३. वरील मुद्दा क्रमांक २ मध्ये नमुद वितरण व्यवस्थेसाठी प्रचलित दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. वैयक्तिक नळ जोडण्या देण्यासाठी नळ जोडणीसाठीचा दर सोबत जोडलेल्या परिशिष्ट -अ- नुसार घेण्यात यावा.

४. वरील कामांसाठी तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणीचे अधिकार, निविदा स्विकृतीचे अधिकार शासनाच्या वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राहतील.

५. प्रत्येक जिल्ह्याने वरील उपाययोजनांद्वारे जास्तीत जास्त कार्यात्मक नळ जोडणीचे उद्दिष्ट साध्य करणे क्रमप्राप्त आहे.

६. वरील कार्यवाही करून १०० टक्के नळजोडणी दिलेल्या गाव/वाड्यांच्या माहितीची नोंद वेळोवेळी IMIS प्रणालीवर घ्यावी.

७. उपरोक्त नमुद बाबींसाठी वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना प्राप्त होणा-या निधीचा देखील वापर करता येईल.

सद्यस्थितीत राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या चालु योजना व ज्या योजनांमध्ये केवळ सुधारणात्मक पुनर्जोडणीद्वारे (रेट्रोफिटींग) दरडोई दरदिवशी ५५ लिटर पाणी पुरवठा करणे शक्य होणार नाही अशा योजनांबाबत जल जीवन मिशन अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००६३०१३०७५८६१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VASANT BHIMRAO MANE

Digitally signed by VASANT BHIMRAO MANE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=280e2beac20f526041fee94f6226522e1407a7f6aa0b06c8769634d48c2976bc, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VASANT BHIMRAO MANE
Date: 2020.07.08 14:48:16 +05'30'

**( वसंत माने )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्य मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधिमंडळ, मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधिमंडळ, मंत्रालय, मुंबई
८. सर्व सन्माननीय विधिमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
९. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
१०. मा.अपर मुख्य सचिव ( पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई

११. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर, मुंबई-२१
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
१४. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१६. सह सचिव / उपसचिव / विशेष कार्य अधिकारी सर्व, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई
१७. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई
१८. मुख्य अभियंता (सर्व),/ अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१९. कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, (सर्व)
२१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील अवर सचिव / कार्यासन अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)
२२. निवडनस्ती (कार्यासन पापु - ०७).

## परिशिष्ट -अ

## आर्थिक निकष व घरगुती नळ जोडणी दरनिश्चिती :

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांमध्ये नळ जोडणी संदर्भातील दर निश्चित करण्यात आले आहेत, ते खालील तक्यात नमूद करण्यात आले आहेत. (तक्यात नमूद केलेल्या नळ जोडणी दरामध्ये जलमापकाचा समावेश करण्यात आलेला नाही.)

| Cost of 15 mm Service connection for Distribution Network of any pipe in (Rs.) | | | |
|---|---|---|---|
| SN. | Type of Service Connection | Without Road Crossing | With Road Crossing |
| १) | MDPE / UPVC | १७२१/- | २६६८/- |
| २) | GI Med. | २१९६/- | ३३८०/- |

*****

राज्यात जल जीवन मिशन
राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक : जजमि २०१९/प्र.क्र.१३८ /पापु-१०(०७)
जी. टी. हॉस्पिटल आवार, नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक : ०४ सप्टेंबर, २०२०

**वाचा:**

१. केंद्र शासनाच्या जल जीवन मिशनच्या कार्यरत मार्गदर्शक सूचना दि. २५.१२.२०१९
२. शासन निर्णय क्र. ग्रापापु-२०१८/प्र.क्र. ४०/पापु.-१० दि. ०७.०८.२०१८
३. शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र. १०४(अ)/पापु.-०७ दि. १७.०३.२०१०
४. (शासन निर्णय क्र. ग्रापाधो-२०१८/प्र.क्र. १७१/पापु.-०७ दि. ११.०२.२०१९
५. शासन निर्णय क्र. ग्रापापु-२०१८/प्र.क्र. ४०/पापु.-१० दि. १६.०८.२०१९
६. शासन निर्णय क्र.जजीमि /०६२०/प्र.क्र. २०/पापु.-०७ दि. ३०.०६.२०२०

**प्रस्तावना:-**

सन २००९-१० पासून केंद्र शासन पुरस्कृत सुरु असलेला राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम जल जीवन मिशनमध्ये समाविष्ट करुन, पुनर्रचना करण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे. यानुसार ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत "हर घर नल से जल" (FHTC-Functional Household Tap Connection) प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास शासन कटिबध्द आहे. सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या अंतर्गत प्रत्येक ग्रामीण व्यक्तीस, स्वयंपाकासाठी आणि घरगुती वापरासाठी शुद्ध व पुरेसा आणि शाश्वत पाणी पुरवठा सर्वकाळ आणि सर्व परिस्थितीत सोयीच्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे हे उद्दिष्ट आहे. यात फक्त योजना पुर्ण करणे एवढाच ऊदेश नसुन कार्यक्षम पाणी पुरवठ्याची एक शाश्वत सेवा उपलब्ध करणे हा त्यामधील प्रमुख गाभा आहे. केंद्र शासनाच्या कार्यरत मार्गदर्शक सुचनांनुसार जल जीवन मिशनची राज्यात अंमलबजावणी करणे आणि मिशन अधिकाधिक परिणामकारक होण्याकरिता सध्या अस्तित्वातील अंमलबजावणीसाठीच्या प्रचलित कार्य पध्दती व निकषांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

(१) राज्य मंत्रीमंडळाच्या दि. ८.०७.२०२० रोजी झालेल्या बैठकीत राज्यात केंद्र शासन प्रणित जल जीवन मिशन राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. यानुसार राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला सन २०२४

पर्यंत, वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करण्याचे लक्ष्य आहे. सदर जल जीवन मिशन ५०:५० टक्के केंद्र व राज्य हिश्याने राबविण्यात येईल.

(२) उद्दिष्ट :

जल जीवन मिशनअंतर्गत, सन २०२४ पर्यन्त राज्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास घरगुती कार्यात्मक नळ जोडणीव्दारे विहित गुणवत्तेचे पाणी प्रती माणसी प्रती दिन किमान ५५ लिटर या प्रमाणात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.

(३) कृती आराखडा :

३.१) जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला पिण्याच्या पाण्याची सुरक्षा (Drinking water security) देण्यासाठी प्रत्येक घरात कार्यात्मक नळ जोडणीव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता ही किमान भारतीय दर्जा - BIS : १०५०० अशी असावी असे अपेक्षित केले आहे.

३.२) राज्यातील प्रत्येक घराला कार्यात्मक घरगुती नळ जोडणीव्दारे (Fuctional Household Tap Connections) पाणी पुरवठा करण्यासाठी बेस लाईन सर्वेक्षण करुन पुढील ४ वर्षाचे नियोजन करण्यात यावे.

३.३) जल जीवन मिशनअंतर्गत प्रत्येक कुटुबांस सन २०२४ पर्यंत घरगुती नळ जोडणीव्दारे पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करुन दयावयाची आहे. यानुसार गाव कृती आराखडा (VAP), जिल्हा कृती आराखडा (DAP) व राज्य कृती आराखडा (SAP) तयार करावा. सदर कृती आराखडयामध्ये दयावयाच्या नियोजित घरगुती नळ जोडण्याचे व त्याकरिता आवश्यक असणाऱ्या निधीचे त्रैमासिक व वार्षिक नियोजन यांचा समावेश असावा. गाव कृती आराखडा तयार करण्यासाठी अंमलबजावणी सहाय्य संस्था (ISA), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उपविभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची मदत घेण्यात यावी.

(४) **जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची अंमलबजावणी :**

जलजीवन मिशनमध्ये पुढील प्रकारच्या योजनांचा समावेश करावा.

४.१) ज्या योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) अंतर्गत सुरु आहेत, अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) किमान ५५ LPCD प्रमाणे करून कार्यात्मक घरगुती नळ जोडणी करणे. तसेच ज्या गावांमध्ये स्टँड पोस्ट नळ पाणी पुरवठा योजना आहेत, अशा गावांमध्ये स्टँड पोस्टपासून प्रत्येक कुटुंबापर्यंत/घरापर्यंत घरगुती कार्यात्मक घरगुती नळजोडणी देण्यासाठी पूर्वीच्या योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

४.२) पूर्ण झालेल्या योजनांच्या बाबतीत ४० LPCD ऐवजी किमान ५५ LPCD पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

४.३) ज्या गावांमध्ये पिण्यायोग्य मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) उपलब्ध आहे, अशा गावांमध्ये स्वतंत्र योजना घेणे.

४.४) ज्या गावांमध्ये मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) पाणीसाठा उपलब्ध आहे, मात्र पाण्याची गुणवत्ता योग्य नाही, अशा गावांमध्ये जल शुद्धीकरणाच्या प्रकल्पासह स्वतंत्र योजना घेणे.

४.५) ज्या गावांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी आहे, अशा गावांसाठी प्रादेशिक/ अनेक गाव योजना (Water Grid) घेणे.

४.६) आदिवासी भागात नळ पाणीपुरवठा सोय नसलेल्या आदिवासी गावे/ वाड्या/ पाडे यांना कायमस्वरुपी पाणी पुरवठा करून प्रत्येक घरात कार्यात्मक नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा करणे , जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे, अंगणवाडी इत्यादी करिता सदर योजनेतून नळ जोडणी देणे. तसेच एकाकी/आदिवासी वाडी/पाड्यांकरीता सौर ऊर्जा आधारित नळ पाणी पुरवठा योजना राबविणे

४.७) दलित वस्तीमधील सर्व घरांना कार्यात्मक नळ जोडणीव्दारे पाणी पुरवठा देणे व योजनेच्या लाभार्थ्यांची स्वतंत्र माहिती ठेवणे.

**(५) जल जीवन मिशनची नवीन अंमलबजावणी कार्यपद्धती :**

५.१) पाणीपुरवठा योजनांच्या विशिष्ट उपांगाचे (पाण्याची टाकी, पंप हाऊस ईत्यादी) संभाव्य संकल्प चित्र आराखडे व त्यांची अंदाजपत्रके (भौगोलिक क्षेत्र आणि तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार) राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून तयार करुन उपलब्ध करुन देण्यात येतील. त्याप्रमाणे सर्व यंत्रणांनी या आराखडयानुसार पुढील कार्यवाही करावी.

५.२) पाणीपुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या दर्जेदार (भारतीय मानांकनाप्रमाणे) बांधकाम व अभियांत्रिकी साहित्य/यंत्रसामुग्रीचा (पाईप, विद्युत पंप, वॉल्व्हस, सिमेंट, स्टील वगैरे) आवश्यकतेप्रमाणे दरकरार करणे /एजन्सी नेमणे ई. कार्यवाही राज्य पाणी व स्वच्छता मिशनद्वारे करण्यात येईल. या दरपत्रकावर आधारित अंदाजपत्रके व आराखडे सर्व यंत्रणांनी करावेत.

५.३) राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीमार्फत पाणीपुरवठा योजनांच्या जलद अंमलबजावणीसाठी मध्यवर्ती निविदा प्रक्रियेद्वारे नामांकित बांधकाम संस्था व पुरवठादार यांचे जिल्ह्यांसाठी पॅनेल तयार करण्यात येईल. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन या पॅनेलमधून पाणीपुरवठा योजना करण्यासाठी एका योजनेकरीता एका संस्थेची निवड करेल. मात्र ग्राम पातळीवरील

योजनांसाठी अशी निवड करताना जिल्हा समिती, ग्राम पाणी समितीला विश्वासात घेऊन/ विचारविनिमय करुन अंमलबजावणी संस्थेची निवड करेल.

५.४) जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनला वित्तीय मर्यादेचे अधिकार प्रदान केले जातील.

५.५) पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान आणि अंतिम देयक अदायगी करण्यापूर्वी जल जीवन मिशन च्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात येईल. राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीमार्फत नेमलेल्या त्रयस्थ तपासणी संस्थांचे पॅनेल मधील संस्थांमार्फत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनकडून या गावांच्या योजनांची त्रयस्थ तपासणी करण्यात येईल.

५.६) स्वतंत्र योजनेसाठी जास्तीत जास्त १८ महिन्यांचा व अनेक गाव योजनांसाठी ३६ महिन्यांचा कालावधी अनुज्ञेय राहिल. ज्या योजना पूर्ण करण्यास ३ वर्षांचा कालावधी लागणार आहे, अशा योजनांचे कार्यादेश/कार्यरंभ आदेश/करार (Contract) अंमलबजावणीकरिता मार्च २०२१ पूर्वी देण्यात यावेत. ज्या योजना पूर्ण करण्यास २ वर्षांचा कालावधी लागणार आहे, अशा योजनांचे कार्यादेश/ कार्यरंभ आदेश/करार (Contract) अंमलबजावणीकरिता मार्च २०२२ पूर्वी देण्यात यावेत, यानुसार गाव कृती आराखडा (VAP) व जिल्हा कृती आराखडा (DAP) तयार करण्यात यावा.

**(६) जल जीवन मिशनसाठी संस्थात्मक यंत्रणा :**

जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचना दिनांक २५.१२.२०१९ रोजी केंद्र शासनाने प्रसिध्द केल्या आहेत हा एक कालमर्यादित कार्यक्रम आहे. विहित कालावधीत उद्दीष्टपूर्ती करण्याचे लक्ष्य असल्याने यासाठी मजबूत चार स्तरीय संस्थात्मक संरचना तयार करण्यात आली आहे. ती अशीः-

१) राष्ट्रीय स्तरावर "राष्ट्रीय जल जीवन मिशन" (NJJM)

२) राज्य स्तरावर राज्य पाणी व स्वच्छता मिशन (SWSM )

३) जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (DWSM)

४) ग्राम पातळीवर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC).

याअनुषंगाने राज्यात खालीलप्रमाणे संस्थात्मक यंत्रणा निर्माण करण्यात येत आहेत.

६.१. <u>राज्य पाणी व स्वच्छता मिशन ( SWSM )</u>

६.१.१ पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील योजनांसाठी या विभागामार्फत दिनांक १०.०२.२०१० रोजी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत राज्य पाणी व स्वच्छता मिशनची नोंदणी करण्यात आली आहे. या मिशनमध्ये राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती आहे. जल

जीवन मिशन व स्वच्छताविषयक कार्यक्रमांचे राज्यातील नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण याबाबत संपूर्ण जबाबदारी व अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशनला आहेत. जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्य पाणी व स्वच्छता मिशनला कार्य करण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. राज्य पाणी आणि स्वच्छता मिशनला (SWSM) जल जीवन मिशनसाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

**६.१.२ राज्य पाणी व स्वच्छता मिशनसाठी मनुष्यबळ**

अ) भारतीय प्रशासकीय सेवा संवर्गातील सचिव दर्जाचे "जल जीवन मिशन संचालक" हे पद नव्याने निर्माण करण्यात येत आहे. मिशन संचालक हे राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीचे सदस्य सचिव व मिशन संचालक म्हणून काम करतील. शासन निर्णय क्र.ग्रापाधो/१११० प्र.क्र. १७८/पापु ०७ दिनांक १२ मार्च, २०१२ अन्वये पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेची (WSSO) स्थापना करण्यात आली होती. आता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही संस्था राज्य पाणी व स्वच्छता मिशनमध्ये विलीन करण्यात येत आहे. या संस्थेमध्ये ३० पदे कंत्राटी पद्धतीने तर २६ पदे प्रतिनियुक्तीने भरण्यात आली आहेत.

सदर अस्तित्वात असलेली ५६ पदे कमी करुन व केंद्र शासनाच्या जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचना लक्षात घेऊन जल जीवन मिशन करीता एकूण ३९ पदे घेण्यात येणार असून ही प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील. या प्रस्तावित ३९ पदांपैकी २६ प्रतिनियुक्तीची पदे सध्या (पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेममध्ये) मध्ये मंजूर असून त्याव्यतिरिक्त १३ पदे मिशनच्या कालावधीकरीता नव्याने निर्माण करण्यात आलेली आहेत. त्यांचा गोषवारा परिशिष्ट १ मध्ये देण्यात आला आहे. प्रतिनियुक्तीच्या पदांच्या वेतन व अनुषंगिक बाबींचा वार्षिक खर्च जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाला करावा लागणार असल्याने प्रतिनियुक्तीच्या पदांच्या वेतन व भत्त्यापोटी येणाऱ्या खर्चाकरीता राज्य हिश्याच्या निधीमध्ये आवश्यक ती वार्षिक तरतूद करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासनाने सूचविलेल्या मनुष्यबळाव्यतिरिक्त आवश्यकतेप्रमाणे अन्य मनुष्यबळ संस्थेस बाह्य संस्थेद्वारे उपलब्ध करुन घेता येईल. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, मिशनच्या कालावधीत मिशनसाठी आवश्यक असलेली राज्य/जिल्हा/तालुका स्तरावरील पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यावावतचे अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीला प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि या पदावरील खर्च हा जलजीवन मिशन अंतर्गत प्राप्त होणा-या सहायकृत बाबींसाठी असलेल्या निधीच्या प्रमाणाच्या मर्यादेत राहणे आवश्यक राहील.